# MEDIA COVERAGE

# TATA POWER FELICITATES EFFORTS OF THE MERITORIOUS STUDENTS OF DHERAND AND SHAHAPUR VILLAGES

Dainik Krushival, Alibaug

## गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान

**अलिबाग :** टाटा पॉवरतर्फे सामाजिक विकास कार्यक्रमांतर्गत हाती घेतलेल्या 'शिष्यवृत्ती योजने' अंतर्गत धेरंड आणि शहापूर गावातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सन्मानार्थ आयोजिलेल्या समारंभात शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आल्या. धेरंड आणि शहापूर गावातील विद्यार्थ्यांच्या २०१०-११ या शैक्षणिक वर्षातील कामगिरीच्या आधारे शिष्यवृत्तीसाठी अर्ज प्राप्त झाले होते. प्राप्त झालेल्या अर्जांपैकी ३० विद्यार्थांची त्यांच्या गुणवत्तेच्या आधारे निवड करण्यात आली. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे, त्यांच्यामध्ये निरोगी स्पर्धेची भावना निर्माण करणे आणि शिक्षण क्षेत्रामध्ये उत्तम गुणवत्ता प्राप्त करण्यास प्रोत्साहन देण्याच्या मुख्य हेतूने ही योजना चालविली जात आहे.

Dainik Ratnagiri Times

## धेरंड आणि शहापूर गावातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या उत्तम कामगिरीचा टाटा पॉवरतर्फे सन्मान

अलिबाग, २५ एप्रिल (वार्ताहर)- भारतातील सर्वात मोठी एकात्मिक वीज व्यावसायिक कंपनी असलेल्या टाटा पॉवरतर्फे सामाजिक विकास कार्यक्रमांतर्गत हाती घेतलेल्या 'शिष्यवृत्ती योजने' अंतर्गत धेरंड आणि शहापूर गावातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सन्मानार्थ आयोजिलेल्या समारंभात शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आल्या.

धेरंड आणि शहापूर गावातील विद्यार्थ्यांच्या २०१०-११या शैक्षणिक वर्षातील कामगिरीच्या आधारे शिष्यवृत्तीसाठी अर्ज प्राप्त झाले होते. प्राप्त झालेल्या अर्जांपैकी ३० विद्यार्थ्यांची (इयत्ता आठवी, नववी आणि दहावीमधील प्रत्येकी १०) त्यांच्या गुणवत्तेच्या आधारे निवड करण्यात आली. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे, त्यांच्यामध्ये निरोगी स्पर्धेची भावना निर्माण करणे आणि शिक्षण क्षेत्रामध्ये उत्तम गुणवत्ता प्राप्त करण्यास प्रोत्साहन देण्याच्या मुख्य हेतुने ही योजना चालविली जात आहे. पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांच्या नावे राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये खाती उघडण्यात आली असून त्याद्वारे विद्यार्थ्यांच्या शिक्षणासंबंधीच्या हक्कांवर भर देण्यात येऊन त्यासंबंधीचे निर्णय घेण्याच्या प्रक्रियेमध्ये त्यांना देखील सहभागी करून घेण्यात येत आहे.

२०० पेक्षा जास्त ग्रामस्थ या हृद्य समारंभास साक्षी होते. तसेच चार शाळांचे मुख्याध्यापक आणि गावातील अन्य मान्यवरांनी आपल्या उपस्थितीने समारंभाची शोभा वृध्दिंगत केली. स्व-मदत गटाच्या सभासदांनी सादर केलेल्या स्वागतगीताने कार्यक्रमाची सुरूवात झाल्यानंतर निवड झालेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आल्या. शाळेतील मुलभूत शैक्षणिक सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी कंपनीतर्फे देण्यात येणार असलेल्या शैक्षणिक सामग्रीची यादीदेखील या प्रसंगी कंपनीतर्फे सादर करण्यात आली.